|| न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ||

श्री. बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, अंबप. संचलित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड्.), अशोकराव माने

## विद्यानगर, पेठ वडगाव.

ता. हातकणंगले | जि. कोल्हापूर

बी. एड्. सेमिस्टर भाग -

प्रात्यक्षिक नाव - Language Across the School curriculum.

विषय - A7.

प्रेरणा स्थान - प्र. प्राचार्या सौ. निर्मळे आर. एल.

छात्राध्यापकाचे नाव - कु. चौगुले अमृता अशोक.

मार्गदर्शकाचे नाव - प्रा. सौ. शिंदे आर. डी.
प्रा. सौ. चरणकर जे. एस.

रोल नंबर -

शैक्षणिक वर्ष - 2022-023

मार्गदर्शक स्वाक्षरी

प्राचार्य स्वाक्षरी

Scanned with ACE Scanner

Lucky Page No.:
Date : / /

• प्रेरणा -

प्र. प्राचार्या. सौ. निर्मळे

आर. एल.

• मार्गदर्शिका -

प्रा. सौ. शिंदे आर. डी.

प्रा. सौ. चरणकर जे. एस.

Scanned with ACE Scanner

# • मार्गदर्शिका -

प्रा. सौ. शिंदे

# अनुक्रमणिका

| तपशील | मार्गदर्शिकाची सही |
|---|---|
| प्रस्तावना | |
| उद्दिष्ट्ये | |
| Unit I - Multilangualism in the classroom. | |
| Unit II - classroom discourse | |
| Unit III - Reading in the content area. | |
| Unit IV - Writing in the content area. | |
| स्वानुभव. | |
| समारोप. | |

FOR EDUCATIONAL USE

Scanned with ACE Scanner

# प्रस्तावना

शिक्षणप्रक्रियेमध्ये शिक्षणाचे उद्दिष्ट्ये ठरविणे. ती साध्य करण्यासाठी, अभ्यासक्रम तयार करणे, तो पाठ्यक्रम पाहून घेण्यासाठी पाठ्यपुस्तक तयार करणे. पाठ्यपुस्तकातील आशय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, यासाठी अभ्यासक्रम, मूल्यमापन, शिक्षकांची ध्येय साध्य करण्याचे सर्वात शिस्तबद्ध आणि प्रभावी माध्यम आहे.

प्रत्येक विद्यार्थी इयत्तानुसार पाठ्यपुस्तके, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ तयार करते. पाठ्यपुस्तके ही पाठ्यक्रम पुस्तिका असते. अशारीतीने पाठ्यपुस्तके शालेय जीवनात महत्त्वाची आहेत.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with ACE Scanner

# उद्दिष्ट्ये -

विद्यार्थी शिक्षक सक्षम करण्यासाठी -
विद्यार्थ्यांची भाषा पार्श्वभूमी समजून घेणे.

वर्गात असिल्यात असलेल्या भाषेच्या विविधतेबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे.

वर्गातील प्रवचनाचे स्वरूप समजून घेणे आणि वर्गात मौखिक भाषा वापरण्यासाठी धोरणे विकसित करणे.

विविध शालेय विषयांमधील आशयाच्या भागात वाचनाचे स्वरूप समजून घेणे.

शालेय विषयांमधील विशिष्ट सामग्री क्षेत्रातील लेखनाचे स्वरूप समजून घेणे.

Scanned with ACE Scanner

# UNIT-1

## Multilangualism in the classroom

### Activity 1 -

वर्गात बहुभाषिकतेच्या विविध पैलूंवर परिसंवाद -

बहुभाषिकता म्हणजे तीन किंवा अधिक भाषांमध्ये प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी वैयक्तिक स्पीकर किंवा स्पीकर्सचा समुदाय.

ज्याची मूळ भाषा ही शाळेची भाषा नाही. अशा परिस्थितीला सहसा आव्हानात्मक म्हणून पाहिले जाते. बहुभाषिकतेमुळे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आणि त्यात समाविष्ट केलेला किंवा केल्या जाणाऱ्या सकारात्मक योगदाना बद्दल जागरुकता वाढणे ही आणि समजून घेणे. हा या युनिटच्या उद्देश आहे.

भारतीय बहुभाषिकतेचे अनेक विशेष आहेत; पण अनेक अधिकृत भाषा असलेला भारत हा काही एकमेव देश नाही. कॅनडा, स्वीत्झर्लंड, बेल्जियम असे अनेक बहुभाषिक देश आहेत. आपल्याकडे एक म्हण आहे; दर बारा कोसांवर पाणी आणि भाषा बदलते. पाणी प्रवाही आहे आणि बहुभाषिकता ही प्रवाही आणि नैसर्गिक आहे. चीनसारखा महाकाय देश एकभाषिक, कारण ते एक राजकीय हेतूनं राबवलेलं धोरण आहे.

भारतात बहुभाषिकता प्राचीन काळापासून, नैसर्गिक क्रिया, आपसूक विकसित झाली आहे. भारतीय सामाजिक जीवनात ही गोष्ट सर्वत्र दिसते. सेतू

Scanned with ACE Scanner

# आपण या घटकामध्ये काय शिकलो-

आपण विद्यार्थ्यांच्या बहुभाषिकतेवर शिक्षणासाठी स्त्रोत कसे काढावे.

आपल्या वर्गातील शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या त्यांच्या सर्व भाषेमध्ये शिक्षणाची संधी कशी द्यावी याची योजना करावी वर्गात अनुदान भाषेचे फायदे सांगावेत.

बहुतेक जगामध्ये बहुभाषिक विद्यार्थी, अपवाद वगळता आदर्श आहेत. एकापेक्षा अधिक भाषा जाणून घेण्याच्या संज्ञात्मक आणि व्यावहारीक फायद्याबद्दलच वस्चे संशोधन आणि पुरावे आहेत असे ज्ञान शिक्षक आणि शिक्षणासाठी प्रचंड संसाधन आहे.

विद्यार्थ्यांच्या घरची भाषा शिकवावी.

बहुभाषिक भाषिकांना धडे दिले पाहिजेत किंवा त्यांच्या मूळ भाषेला जिथे शिकायचे आहे. त्याबद्दल सूचना दिल्या पाहिजेत.

विद्यार्थ्यांना एक आवडीचे पुस्तक वापरण्यास सांगा जे इंग्रजी आणि मातृभाषेची शब्दावली दर्शविते.

मातृभाषेतून अनुवादावर महत्त्वपूर्ण जोर देऊन भाषा संरचना आणि शब्दसमूह शिकवा.

Scanned with ACE Scanner

मातृभाषा - वर्गामध्ये तोंडीभाषेला महत्व देण्यात आले आहे. विद्यार्थी आपले मत आणि भावना जास्तीत जास्त मातृभाषेतून चांगल्याप्रकारे मांडतो आणि मातृभाषा ही नेहमी ओठांवर रेंगाळत असते. त्यामुळे मातृभाषा ही महत्वाची भाषा आहे.

भाषेतील भाषा / प्रमाण भाषा - तोंडी भाषेमध्ये प्रमाण भाषा महत्वाची आहे. शालेय स्तरावर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे प्रमाण भाषेमध्येही तोंडी स्वरूपात दिली जातात. त्यामुळे प्रमाण भाषा ही तोंडी भाषा वर्गामध्ये महत्त्वाची आहे.

राष्ट्रीय भाषा - काही वेळा तोंडी भाषेमध्ये राष्ट्रीय स्तरावर हिंदी लोकभाषा स्वीकारली आहे. त्यामुळे शाळेमध्ये व इतर सरकारी कार्यालयामध्ये या राष्ट्रीय भाषेला खूप महत्व आहे.

संपर्क भाषा - काही वेळा तोंडी भाषेमध्ये राष्ट्रीय स्तरावर हिंदी लोकभाषा स्वीकारली आहे. त्यामुळे शाळेमध्ये व इतर सहकारी कार्यालयांमध्ये राष्ट्रीय भाषेबरोबर संपर्क भाषा सुद्धा तोंडीभाषे-मध्ये ~~राष्ट्रीय भाष~~ समावेश करण्यात आली आहे. कारण सुद्धा संपर्क साधण्यासाठी वापरली जाणारी भाषा आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर English ही व्यवहाराची व संपर्क भाषा आहे. त्यामुळे वर्गातील विद्यार्थ्यांना त्या विषयाचे प्रश्नोत्तरे त्या विषयाच्या भाषेतून द्यावे असे महत्व देण्यात आले आहेत.

इतर भाषा - मानवाच्या सभोवताली किंवा परिसराभोवती अनेक भाषा ऐकायला येतात व बोलल्याही जातात. त्यांच्यामध्ये अनेक विविध शब्दांची मांडणी केली त्यामुळे अनेक भाषांमध्ये शब्दां-ची मांडणी केलेली असते. तीच भाषा विद्यार्थी आपल्या समू-समूहातील व्यक्तीला समजण्यासाठी वापरतात. त्यामुळे त्यांना अनेक भाषांचे महत्व पटते व अवगत होते.

Scanned with ACE Scanner

बोली भाषा - बोली भाषा हीच मातृभाषा असते. यामधील शब्द व पुस्तक शब्द यामध्ये बराचसा फरक आढळून येतो.

सांकेतिक भाषा - सांकेतिक भाषेमध्ये काही वेळा अवघड ठिकाणी व काही वेळा खाणाखुणांमार्फत प्रश्न विचारले जातात. यामध्ये काही प्रश्नांची उत्तरे ओळखणे सोपे असते. तर काही वेळा या खाणाखूणा मोठा अर्थ सांगून जातात.

तंत्रज्ञान भाषा - आजच्या तंत्रज्ञान युगामध्ये तंत्रविषयिक नवीन भाषा उदयास आली आहे. यामध्ये काही प्रश्नांची उत्तरे ओळखणे सोपे असते. तर काही वेळा या खाणा तंत्र भाषेचे अधिक शब्द विकसित झाले आहेत.

विज्ञानविषयक भाषा -
बहुभाषिक मध्ये विकसित भाषा सुद्धा एक पैलू आहे. यामध्ये अनेक भौतिकशास्त्र, जीवशास्त्र व रसायनशास्त्र विषयक शब्द व नवनवीन शब्द विकसित होत आहेत.

ऐतिहासिक व सांस्कृतिक भाषा -
या भाषेचा सुद्धा विविध भौषिक पैलूमध्ये समावेश होतो. अनेक परंपरावादी व जुन्या ऐतिहासिक गोष्टी सांगण्यासाठी या भाषेचा वापर केला जातो.

इतर भाषा - भारत विविधतेसाठी ओळखला जाणारा देश आहे. भारतामध्ये एकूण २१ भाषा बोलल्या जातात. वर्गामध्ये देखील अनेक वेगवेगळ्या भाषा बोलणारी मुले आढळतात. त्यामुळे त्यांना अनेक भाषांचे ज्ञान प्राप्त होते. शब्दांच्या अर्थ समजला जातो.

Scanned with ACE Scanner

# शिक्षण क्षेत्रातील बहुभाषिक पैलू -

## मराठी प्रमाण भाषा-

यामध्ये बौध्दिक विकासाच्यावेळी सर्वात महत्त्वपूर्ण भाषा म्हणजे मराठी भाषा किंवा प्रमाण भाषा मातृभाषेतून हा विकास विकास म्हणजे थोडे क्लिष्ट आहे. शालेय स्तरावर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी, लेख लिहिण्यासाठी पत्रव्यवहार करण्यासाठी, व्यवहारिक कामासाठी प्रमाण भाषा महत्त्वाची आहे.

## अलंकारिक भाषा -

मातृभाषेत अलंकारीक भाषेचा वापर जास्त असतो. यामध्ये मानवाच्या मनाची प्रतिक्रिया मांडताना त्याला सौंदर्य आणण्यासाठी अलंकारी भाषेचा उपयोग होतो. यामध्ये अनेक पैलू लपलेले आहेत.

एकापेक्षा अधिक भाषेमध्ये संवाद साधण्यासाठी क्षमता वाढल्या. एकत्रित, जागतिक, व्यावसायिक समुदायामध्ये अधिकाधिक महत्त्वाचे होत आहे. आपल्या भविष्यातील व्यावसायिक प्रयत्नांमध्ये मुलांना यशस्वी होण्यासाठी ही भाषा महत्वाची आहे.

भाषा कौशल्य ही एक मालमत्ता आहे. आयुष्यभर प्रभावी संप्रेदनांना प्रोत्साहन देणारे कौशल्य आहे.

# UNIT-2

## Classroom Discourse

**Activity b) -** वर्गातील तोंडी (मौखिक) भाषेचे महत्व या विषयावर परिसंवाद.

**प्रस्तावना -**

तोंडी भाषेतील वर्गातील महत्व हे शिक्षणात फार महत्वाचे आहे. तसेच काही तोंडी भाषेचे शैक्षणिक महत्व सुद्धा खूप महत्वाचे आहे. तोंडी भाषेमधून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व दिसून येते.

भाषा ही कोणत्याही वंश, पंथ आणि जगाच्या सद्याच्या दैनंदिन आयुष्यावर प्रभाव टाकते. भाषा ही आपल्या सभोवतालच्या जगाला आपल्या भावना इच्छा आणि प्रश्न व्यक्त करण्यास मदत करते. भावनांचे विस्तृत वर्णन दर्शविण्यासाठी शब्द, स्वर आणि व्यंजन इ. वापर केला जातो. लिखित आणि बोली भाषेतून कायमस्वरुपी बंधने बनविण्यासाठी आपल्या सहज क्षमतेला वापर करण्यास परवानगी देते. याचा एक मोठा भाग आहे. मानवजातील इतर प्राण्यांपासून वेगळे करते. संप्रेषणाचे महत्व बऱ्याचदा दुर्लक्षित केले जाते. संप्रेषणामध्ये आपली महान कौशल्य असूनही गैरसमज आणि चुकीचे भाषांतर आणि सामान्य आहेत. एखादयाला जगाचा प्रवास करता येण्यासाठी, व्यवसाय करण्यासाठी, नवीन संस्कृती आणि पद्धतीसाठी अनुकूल करण्याची इच्छा आहे. अनुकूलता अर्थातच विविध भाषेमध्ये नवीन लोकांशी संवाद साधण्यासाठी क्षमता समाविष्ट आहे. देशामध्ये संप्रेषण करण्यास कोणताही मार्ग नसल्यास नवीन लोकांशी जुळवून घेणे आणि संवाद साधणे अव अशक्य आहे.

Scanned with ACE Scanner

प्रथम भाषेच्या आणि तोंडी भाषेच्या वापराबद्दल शिक्षकांच्या बऱ्यापैकी तीव्र भावना असतात. हे एकतर प्रोत्साहित केले जाते किंवा प्रतिबिंबीत केले जाते. गार्सीया आणि सिलवान (२०११) यांनी आपल्या संघाच्या जागतिककृत्या जगात झालेल्या झालेल्या एकसारख्या शिक्षणाचे वर्णन केले आहे. आणि फक्त एक भाषा लागू करण्याचा निराग केला आहे. खरतर ते सूचित करतात की शिक्षकांनी त्यांच्या प्रथम भाषा व तोंडी भाषा तसेच सूचना भाषेंची आवश्यकता वाढविण्यास विद्यार्थ्याला पाठिंबा दिला पाहिजे. हे पूर्णतः ~~व्यव~~ व्यवहारीक वाटत असेल तरी ते करण्यासाठी वर्गात वापरल्या जाणाऱ्या सर्व भाषांमध्ये सक्षम करण्यासाठी आवश्यकता शिक्षकांना नेहमीच वाटते.

* तोंडी भाषेतील /भाषेचे वर्गातील महत्वाचे धोरण-

① विद्यार्थ्यांना पालकांसोबत अभ्यासक्रम विषयावर चर्चा करण्यासाठी गृहपाठ चेक करा. जेणेकरुन विद्यार्थ्यांना विषयाबद्दल पूर्व ज्ञान मिळेल आणि त्याचा मूळ भाषेतील शब्द संग्रह विकसित होईल. पालकांची भूमिका अंदाजे असायला नको. पालकांनी आपल्या मुलांच्या मातृभाषेचे शैक्षणिक विकासात धरी जाण्याचा प्रयत्न करावा आणि प्रोत्साहन द्यावे.

② विद्यार्थ्यांना घरगुती भाषेद्वारे जेणेकरुन ते इंग्रजी भाषेत प्रतिसाद मागण्यापूर्वी ते त्यांच्या मूळ भाषेत विषयावर चर्चा करु शकतील.

Scanned with ACE Scanner

# सामान्य विज्ञान

## इयत्ता आठवी



Scanned with ACE Scanner

Page

# UNIT-3

## Reading in the content area

**Activity-c)** स्कीमाच्या सिद्धांतानुसार माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शासकीय कोणत्याही पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण.

### * पाठ्यपुस्तकाचे नाव *


विषय- सामान्य विज्ञान
इयत्ता- आठवी.

पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर विज्ञानासंबंधी चित्रांचा वापर करुन पुस्तक आकर्षक केले आहे. पुस्तकाच्या मुख्य पृष्ठावर प्रयोग, हृदयातील रक्ताभिसरण क्रिया, व पेशी रचना, बल लावून चेंडू उडवणारा मुलगा अशा वस्तू दाखविल्या आहेत.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ जाड कागदापासून बनवलेले आहे म्हणजे छापलेले आहे. मुखपृष्ठावर सामान्य विज्ञान असे मोठ्या अक्षरात लिहिले आहे. तसेच इयत्ता आठवी असे काळ्या अक्षरात लिहिले आहे.

Scanned with ACE Scanner

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.






# सामान्य विज्ञान

## इयत्ता आठवी





महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

J2BJ6J

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

Scanned with ACE Scanner

# * मलपृष्ठ *

मलपृष्ठासाठी देखील मुखपृष्ठाप्रमाणेच आतील कागदापेक्षा चांगला जाड कागदाचा वापर केला आहे. आतील पाने व्यवस्थित व चांगली राहण्यासाठी जाड कागदाचा वापर मुखपृष्ठ व मलपृष्ठा साठी केला जातो.

या पुस्तकाच्या मलपृष्ठावर काही प्राणी दाखविले आहेत. तसेच मशरूमचे चित्र दाखवले आहे. त्याचप्रमाणे अमिबाचे चित्र दाखवले आहे. एक उंच नारळाचे झाड देखील या पृष्ठावर दाखविले आहे.

तसेच मलपृष्ठावर वरच्या दोन ओळीत शासन निर्णय क्रमांक, समन्वय समितीच्या दिनांक दिला आहे. आणि खालच्या बाजूस महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे, लिहिले आहे. आणि पाठ्यपुस्तकाचा 'क्यू आर कोड' दिला आहे.

अशाप्रकारे मलपृष्ठदेखील मुखपृष्ठाप्रमाणेच खूप सुंदर आणि आकर्षित आहे.

Scanned with ACE Scanner

# * पाठ्यांश *

विद्यार्थ्यांना वयानुसार पाठ्यांश दिलेला आहे. विद्यार्थ्यांना विज्ञान हा विषय सोपा जावा म्हणून त्यांची माहिती सोप्या भाषेत लिहिली आहे. विज्ञानामध्ये विविध प्रयोग या पुस्तकामध्ये दिले आहेत.

दैनंदिन जीवनात विज्ञानाचा कसा वापर होतो. व त्यासंबंधी ~~बऱ्यासशा~~ बऱ्याचशा कृती या पुस्तकात दिलेल्या आहेत. पूर्वज्ञानाचा आढावा घेण्यासाठी अवांतर प्रश्न दिलेले आहेत.

जे विज्ञान शिकतो ते शब्दांत मांडून इतरांना व्यवस्थित सांगता यावेत अशी भाषा यामध्ये वापरली आहे.

सामान्य विज्ञानविषयक क्षमता वाढविण्यासाठी पाठ्यांशाच्या आधी सात वेगवेगळ्या प्रकारात पाठाचे वर्गीकरण केले आहे

१) सजीव सृष्टी व सूक्ष्मजीवांचे वर्गीकरण
२) आरोग्य व रोग
३) बल व दाब
४) धाराविद्युत व चुंबकत्व.
५) अणूचे अंतरंग.
६) द्रव्याचे संघटन
७) धातू - अधातू

या सात वेगवेगळ्या प्रकारांचे वर्गीकरण सविस्तरपणे या पुस्तकात पाहायला मिळते.

Scanned with ACE Scanner

# * अनुक्रमणिका *

अनुक्रमणिकेचे स्वरूप या पुस्तकात इतर पुस्तकांपेक्षा काही वेगळे दिलेले नाही. अनुक्रमणिका एकाच भागात आणि एकाच पानावरती बसवली आहे. या पुस्तकात एकूण वीस एकोणीस पाठ आहेत, त्याचप्रकारे अ.क्र., पाठाचे नाव, पृष्ठ क्रमांक अशा क्रमाने अनुक्रमणिका लिहली आहे. या पुस्तकातील एकूण पृष्ठ संख्या 129 आहे.

# * जिज्ञासेला कल्पनाशक्तींचा वाव *

पाठ्यपुस्तक हे केवळ माहितीवर आधारीत नाही. पाठ्य पुस्तकात जिज्ञासेला आणि कल्पनाशक्तीला वाव दिला आहे.

उदाहरण -

1) एखादी संकल्पना सांगायची असेल तर, त्यावर आधारित प्रयोगाच्या माध्यमातून संकल्पना सोडवणे.

2) शास्त्रज्ञांचा फोटो आणि नावावरून त्यांचा सिद्धांत किंवा प्रयोग ओळखू शकतो.

# * मूल्यांचा अंगीकार *

पुस्तकाच्या मुख व मल पृष्ठावरच मूल्य दाखवली आहेत. याचा अर्थ मुलांना चित्रे, प्रयोग, वस्तू आवडतील. यावरून एकत्रित पर्यावरण संरक्षण, दैनंदिन जीवनात विज्ञानाचा वापर यांसारखी मूल्य विद्यार्थी अंगी जोपासतात.

पाठ्यपुस्तकाचे परिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे. शासन बदलले की शासकीय तंत्रे बदलतात आणि पाठ्यपुस्तक बदलतात. असाच आजवरचा अनुभव आहे.

Scanned with ACE Scanner

# * निष्कर्ष *

1) पाठ्यपुस्तकाची रचना समजते

2) पाठ्यपुस्तकातील घटकांमधील मजकूर समजतो.

3) पाठ्यपुस्तकातील सिद्धांत व प्रयोग तसेच वैज्ञानिक आणि शास्त्रज्ञांची अचूक माहिती समजते.

4) पाठ्यपुस्तकातील घटकांमधील शब्दसंग्रह समजतो

5) स्वाध्याय कोणत्या पद्धतीचा असतो हे लक्षात येते

## * संदर्भ सूची -

आशययुक्त अध्यापन -

(डॉ. सुनिल मगर)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक १८ एप्रिल २०१८
भारतीय सौर दिनांक : २८ चैत्र १९४०

Scanned with ACE Scanner

# UNIT-4

## Writing in the content area

**Activity a) -** Seminar on importance of writing in the area.

(सामग्री क्षेत्रातील लेखनाचे महत्त्व या विषयावर परिसंवाद)

ज्याला लिहता वाचता येत नाही त्याला आपण निरक्षर मानतो. निरक्षरता हे मागासलेपणाचे लक्षण आहे. भाषणाप्रमाणे लेखनही आपले मनोगत व्यक्त करण्याचे साधन आहे. लेखनाद्वारे आपण आपल्या भाव, विचार व कल्पनांचाही अभिव्यक्ती करतो. भाषणाद्वारे आपले विचार फक्त काही श्रोत्यांपर्यंत पोहोचतात. पण लेखनाद्वारे मांडलेले विचार फक्त काही दूर-दूरच्या वाचकांपर्यंत पोहचतात. बोललेले आठवणे कठीण असते. पण जे लिहिलेले असते त्याचे वारंवार वाचन करणे शक्य असते. लेखनाला सामाजिक दृष्टीने फार महत्त्व आहे. लोकांना सुस्क सुसंस्कृत, जागृत व सुजाण नागरिक बनविण्याचे कार्य लेखनातून प्रभावी होते. आज प्रत्येक व्यक्तीला लेखन कौशल्य प्राप्त करणे अनिवार्य झालेले आहे. आपले विनंती अर्ज, तक्रारि, निवेदन लिहून सादर करावे. याप्रमाणे लेखन कौशल्य प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे महत्वाचे कौशल्य बनले आहे.

वाचनाने ज्ञान वाढते, सभेत बोलल्याने माणूस हजरजबाबी होतो मात्र लिहिल्याने माणसाचा विचार नेटका व काटेकोर होतो. (असे बेकन या तत्त्ववेत्याने लिहिले आहे.)

Scanned with ACE Scanner

## * लेखन कौशल्याची सुरुवात -

लेखन कौशल्याची सुरुवात लिपिज्ञानाने होते. ज्यात सर्वप्रथम स्ट्रोक्स- (ज्यात उभ्या, आडव्या, तिरप्या रेषा काढण्याची दिशा महत्त्वाची असते.) वळणे - (वर्तुळ, अर्धवर्तुळ, वेलांट्या आणि सर्व वळणे काढण्याचा क्रम, वळण रेखाटण्याची दिशा महत्त्वाची असते.) या सर्व गोष्टींच्या मदतीने लिपिज्ञान होते. ही लेखन कौशल्याची सुरुवात असते.

## * लेखनाचे टप्पे -

लेखन कौशल्य काही सगळ्यांना हातात लेखणी घेतल्याबरोबर प्राप्त होत नाही. ते टप्प्याटप्प्यानेच विकसित होणारे कौशल्य आहे.

त्याचे महत्त्वाचे तीन टप्पे आहेत.

1) हस्ताक्षर - (सुवाच्य, वळणदार)

2) शुद्धलेखन - (ऱ्हस्व, दीर्घ, ऋकार, रफार, विसर्ग, विरामचिन्हे)

3) लेखनप्रकारानुसार स्वतःचे स्वतंत्र लेखन -

या तीन टप्प्यांना सारखेच महत्त्व आहे. कारण लेखनाची सुरुवातच अक्षरलेखनापासून होते. ते त्या वेळीच 'सुवाच्य' म्हणजे वाचता येईल ह्या पातळीपासूनच 'वळणदार' म्हणजे अक्षरांना वळण योग्य दिशेने देऊन काढलेले सुंदर अक्षर होय.

Scanned with ACE Scanner

# • स्वानुभव •

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत कॉलेज ऑफ एज्यूकेशन पेठ वडगाव यांच्यावतीने आमच्या या कॉलेजमध्ये Language across school curriculum हे प्रात्यक्षिक राबविण्यात आले. या प्रात्यक्षिकामध्ये आम्हाला सर्व छात्राध्यापकांना वर्गातील बहुभाषिकतेचे विविध पैलू अभ्यासण्यास सांगितले, तसेच ९ ते १०वी कोणतेही पाठ्यपुस्तक घेऊन त्याच्या मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत माहिती लिहिण्यास सांगितली. या प्रात्यक्षिकामुळे आमचा आत्मविश्वास वाढला.

आमची लेखनाची तयारी झाली. म्हणून मी आमच्या प्रेरणास्थान असणाऱ्या प्राचार्या मॅडम व आमचे मार्गदर्शक अध्यापक व अध्यापिका यांची आभारी आहे.

Scanned with ACE Scanner

# समारोप

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत आमच्या कॉलेज ऑफ एज्यूकेशन (B.ed.) पेठवडगाव अंतर्गत महाविद्यालयामध्ये Language across School curriculum हे प्रात्यक्षिक घेण्यात आले. हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी आम्हाला महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. निर्मळे आर. एल. मॅडम यांची प्रेरणा मिळाली. तसेच या प्रात्यक्षिकामध्ये मार्गदर्शक म्हणून प्रा. श्री. सोरटे एस. के. सर. प्रा. सौ. शिरतोडे व्ही. एल मॅडम तसेच प्रा. सौ. सावंत ए. पी. मॅडम व प्रा. सौ. चरणकर मॅडम यांचे सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले त्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे.

Scanned with ACE Scanner